**नि.फौ.के. नं. ११६/२०२५**
**महाराष्ट्र शासन वि. विजय**
**निशाण क्र. ०९**

**(प्रस्तुत प्रकरणातील आरोपी हा न्यायालयीन कोठडीमध्ये आहे. सदर आरोपी हा इतर गुन्हयांत कोल्हापुर मध्यवर्ती कारागृह येथे असल्याने त्यांचेकडुन व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे सदर आरोपीस हजर करण्यात आले. सदर व्हीडीओ कॉलची आवाज प्रेक्षपणाचा दर्जा तपासुन पाहण्यात आला असुन तो चांगला आहे. सदर आरोपी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर असताना त्याचेसमक्ष साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात येत आहे.**

**सबब, सदर साक्षीदाराची साक्ष खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहे.)**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांचा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – संजयकुमार गंगाराम महाडीक,
**वय –** ५४ वर्षे, **व्यवसाय** – खाजगी नोकरी,
**राहणार –** करंबेळे तर्फे संगमेश्वर, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून –**

०१. माझे मुळ गाव करंबेळे तर्फे संगमेश्वर, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी असुन नोकरीनिमित्त मी चिपळुन येथे राहण्यास असतो. करंबेळे येथे सणवारासाठी येणे–जाणे असते. दिनांक २२/१०/२०२५ रोजी मी करंबेळे येथे भाऊबीज असल्याने आलो होतो व दिनांक २३/१०/२०२५ रोजी मी चिपळुन येथे परत गेलो होतो.

०२. करंबेळे येथे माझ्या घराजवळ स्टॉपशेजारी माझा पुतण्या – मनिष मधुकर महाडीक राहतो. त्याला मी माझ्या घराकडे लक्ष ठेवण्यास सांगितले होते. दिनांक ३०/१०/२०२५ रोजी त्याने मला फोन करुन आमच्या घराचा मागील दरवाजा उघडा

असुन घरातील भांडी समोरील अंगणात ठेवलेली आहेत, असे सांगुन त्याने मला ''तुम्ही घरी आला आहात का'', असे विचारले. मी त्याला घरी आलेलो नसल्याचे सांगितले. त्यामुळे मी लगेचच चिपळुन येथुन करंबेळे येथे आलो. मी माझ्या घरी येवुन पाहिले असता, ''समोरील दरवाजाला लावलेले कुलूप व्यवस्थीत होते व घराच्या मागचा दरवाजा उघडा होता''. त्यानंतर मी समोरील दरवाजाचे कुलुप उघडुन घरामध्ये गेलो असता, हॉलमध्ये खिडकी फोडलेली होती व हॉलच्या दरवाजाचे खालील बाजुचे लाकडी पॅनेल तोडलेले असल्याचे मला दिसले. हॉलच्या डाव्या बाजुला तळ खोली असुन तिची कौले काढलेली असल्याचे व शिडी लावुन घरात प्रवेश केल्याचे मला दिसुन आले. घरातील सर्व कपाटे उघडलेली होती, कपडे अस्ताव्यस्त पडलेले होते. किचनमध्ये जेवण केलेबाबत दिसुन आले. जेवणाची खरकटी भांडी तशीच किचनमध्ये होती व समोरील अंगणात मिठाची बरणी, कळशी, ताट व मेणबत्त्या, आधारकार्ड, सिमकार्ड, जीन्स पॅंट ठेवल्याचे मला दिसले.

०३. त्यानंतर मी पुतण्या व वाडीतील जवळच्या लोकांना तेथे बोलावले होते. त्यानंतर मी पोलीस ठाण्यात जावुन खबर दिली. *(साक्षीदाराला तक्रार दाखविण्यात आली). ती तीच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा आहे. (सदर दस्ताला* ***निशाणी क्रमांक १०*** *देण्यात येते).*

०४. त्यानंतर पोलीसांनी माझ्या घरी येवुन तेथील परीस्थीतीची पाहणी केली होती. पोलीसांनी मनिष महाडीक व मकरंद पांचाळ यांच्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. सदर पंचनाम्यावेळी आणखी एक दोन ग्रामस्थ हजर होते. पोलीसांनी तेथे मिळालेले आधारकार्ड, सिमकार्ड व निळया रंगाची जीन्स पॅंट ताब्यात घेतले होते.

०५. सदरचा मुद्देमाल मला दाखविल्यास मी ओळखु शकतो. *(साक्षीदारास मुद्देमालाचे पुर्वपरवानगीने सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सिल तोडुन तो दाखविण्यात आला). ते तेच जप्त केलेले आधारकार्ड, जीओ कंपनीचे सिमकार्ड व निळया रंगाची जीन्स पॅंट आहे. त्यावर असलेल्या लेबलवर माझी स्वाक्षरी आहे.*

*(आधारकार्ड व सिमकार्ड यांना वस्तु क्रमांक देण्यास आरोपीचे*

*विधीज्ञांनी आक्षेप घेतला की, सदर साक्षीदार हा आधारकार्ड व सिमकार्ड यांचा लेखक नाही. त्यांची मालकी कोणाची आहे हे सदर साक्षीदार सांगु शकत नाही. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी असे म्हणणे सादर केले की, पंचनाम्याचा उद्देश घटनास्थळावरुन काय जप्त करण्यात आले याचा असुन सदर साक्षीदाराने सदरचा मुद्देमाल घटनास्थळावरुन जप्त केल्याचे साक्षीत कथन केले आहे.*

*दोन्ही बाजुंचा युक्तीवाद व साक्षीदाराच्या साक्षीतील कथन पाहिले असता, अभियोग पक्षातर्फे करण्यात आलेला युक्तीवाद संयुक्तिक वाटतो. सदर साक्षीदाराने घटनास्थळावरुन सदरचा तिन्हीही मुद्देमाल त्यांच्या समक्ष जप्त करण्यात आल्याचे साक्षीत कथन केले आहे. त्यामुळे, आक्षेप नामंजुर).*

०६. *(**आधारकार्ड यास वस्तु – 'अ' देण्यात येते. जीओ कंपनीचे सिमकार्ड यास वस्तु – 'ब', व निळ्या रंगाची जीन्स पँट यास वस्तु – 'क'** देण्यात येते).*

०७. पोलीसांनी सदरचा मुद्देमाल जप्त करुन तो सिलबंद करण्यात आला. तसा पंचनामा तेथे करण्यात आला. त्यावर पंचांची व माझी सही घेण्यात आली. तसेच त्यावर पोलीसांनी देखील सही केलेली आहे. सदर पंचनाम्यावेळी फॉरेन्सीक विभागाकडुन हातांचे ठसे पाहणारे व श्वान पथक देखील आले होते. जेवणाच्या भांडयावर त्यांना हातांचे ठसे मिळुन आले होते. तशी पळी (जेवण वाढण्यासाठी वापरण्यात येणारी वस्तु) व चमचा फॉरेन्सीक विभागाकडुन घेण्यात आला होता. त्यांनी ते सिलबंद करुन घेतले नव्हते. *(साक्षीदाराला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला). तो तोच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा आहे. (सदर दस्ताला **निशाणी क्रमांक ११** देण्यात येते).*

०८. पोलीसांनी तेथे घटनास्थळाचा नकाशा रेखाटला होता. तसेच तेथे पोलीसांनी छायाचित्रे घेतली होती. दिनांक २३/१२/२०२५ रोजी पोलीसांनी मला आरोपी पकडला आहे, असे सांगुन मला बोलावले होते. पोलीसांनी मला त्याचे नाव

विजय मधुकर गुरव असे असल्याचे सांगितले होते. त्यामुळे मी करंबेळे या गावी आलो होतो. त्यानंतर पोलीस आरोपीला घेवुन माझ्या घरी आले होते. त्यावेळी आरोपीने तेथे काय–काय केले होते, हे माझ्या व पोलीस यांच्या समक्ष सांगितले. आरोपीला दाखविल्यास मी ओळखु शकतो. आज रोजी व्ही.सी.वरुन दिसत असलेला आरोपी हा तोच आहे.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास – आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. एस. जोशी यांच्याकडून** –

**०९**. माझे बी.कॉम. पर्यंत शिक्षण झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सोबत माझी पत्नी, दोन मुले व माझी आई असे कुटूंब राहते. आम्ही वास्त्व्यास नोकरीनिमित्त चिपळुन येथे असुन आम्ही सर्व एकत्रच बाहेर पडतो. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटना संदर्भाने पोलीसांनी माझी पत्नी, मुले व आई यांच्याकडे चौकशी करुन त्यांचा जबाब नोंदविलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, तसा जबाब नोंदविण्यास कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आधारकार्ड व सिमकार्ड, जीन्स पँट यांचा उल्लेख निशाणी क्र. १० कडील फिर्यादमध्ये केलेला नाही.

**१०**. ***प्रश्नः*** *सदरच्या वस्तु तुम्ही नंतर तेथे टाकल्या होत्या, यावर तुमचे काय म्हणणे आहे ?*

***उत्तरः*** *सदरच्या वस्तु घटनास्थळीच होत्या.*

**११**. हे म्हणणे खरे आहे की, आधारकार्ड, सिमकार्ड व जीन्स पँट यांचा मालक आरोपी नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर वस्तुंशी आरोपीचा कोणताही संबंध नाही. हे मला माहिती नाही की, आधारकार्ड व सिमकार्ड कोणाच्या मालकीचे आहे, त्या व्यक्तीला पोलीसांनी अटक केली नाही, अगर कसे. आधारकार्ड व सिमकार्ड कोणाच्या मालकीचे आहे, त्या व्यक्तीला पोलीसांनी अटक केली का, असे पोलीसांना मी विचारले असता त्यांनी मला नाही असे सांगितले.

**१२**. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराचा क्रमांक निशाणी क्रमांक १०

कडील फिर्यादमध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, वस्तु क कडील जीन्स पँट सारख्या पँट बाजारात सहज उपलब्ध होतात. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी घटनास्थळी पंचनामा केल्याचे, नकाशा रेखाटल्याचे व छायाचित्रे घेतल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मनिष मधुकर महाडीक हा माझा नातेवाईक आहे. हे म्हणणे खरे नाही की, नातेवाईक असल्याने त्याने पंच म्हणुन माझ्या बाजुने पंचनाम्यावर सही केली आहे.

१३. ***प्रश्नः*** *फॉरेन्सीक विभागाकडुन ताब्यात घेण्यात आलेल्या पळी व चमचा सिलबंद केले नसल्याने त्याच्याशी आरोपीचा काहीही संबंध नाही, यावर तुमचे काय म्हणणे आहे?*

***उत्तरः*** *फॉरेन्सीक विभागाने ते ताब्यात घेतल होते, त्याबाबत मी काही सांगु शकत नाही.*

१४. हे म्हणणे खरे आहे की, माझे घर देवरुख–संगमेश्वर रस्त्याला लागुन आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घराच्या बाजुला बौध्दवाडी, पानगलेवाडी व मराठवाडी अशा वाडया आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घराच्या बाजुला इतर लोकांची राहती घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या जवळच करंबेळे स्टॉप आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी आमच्या ग्रामदेवतेचा प्रथम मानकरी आहे. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामदेवताच्या मानकऱ्याच्या घराला कधीही कुलुप लावले जात नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे घराच्या दरवाजाला कुलुप लावुन गेल्याचे सरतपासात मी खोटे कथन केले आहे.

१५. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने शिडी लावुन घरामध्ये प्रवेश केल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने माझ्या घरातील वस्तु चोरी केल्याबाबतचा कोणताही मजकुर माझ्या फिर्यादमध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे विनाकारण कोणताही उद्देश नसताना आरोपीने घरफोडी केल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्यावरुन माझ्या घरात काय चालले आहे, हे दिसते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीमध्ये नमुद केलेल्या मजकुराप्रमाणे आरोपीने

कोणतेही गुन्हयाचे कृत्य केलेले नाही.

**१६.** ***प्रश्नः*** *आधारकार्ड व सिमकार्ड ज्याच्या मालकीचे आहे, त्याच व्यक्तीने तुमच्या घराची घरफोडी केली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?*

***उत्तरः*** *तसे असु शकते.*

**१७.** हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकुर मी खोटा कथन केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने गुन्हयाचे कोणतेही कृत्य केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.02.03 18:16:55 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

जि. रत्नागिरी.

दिनांक ०३/०२/२०२६

स्थळः देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 03/02/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 03/02/2026 |
| Evidence uploaded on | :- | 03/02/2026 |